**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०५/ २०१६.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : ०८/ ०३ /२०१६.

अहमदनगर महानगरपालिकेच्या विशेष सभेची सुचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (ड) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०५, शुक्रवार दिनांक ११/ ०३ /२०१६.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती............................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

महोदय,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( ड ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची विशेष सभा **शुक्रवार दिनांक ११/०३/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील महानगरपालिका सभागृहात** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक-५ शुक्रवार दिनांक ११ / ०३ / २०१६ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिका सभागृह, नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड, अहमदनगर येथे होणा-या विशेष सभेची

**विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| ५८ | चौदावा वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार ५० टक्के घनकचरा व्यवस्थापन कामाकरीता खर्च करण्यासाठी प्राप्त झालेल्या व प्राप्त होणा-या निधीतुन हाती घ्यावयाचे कामास प्रशासकीय मंजुरी देणे बाबत.. **(संदर्भ : दि.०७/०३/२०१६ रोजी मे.राष्ट्रीय हरीत लवाद, पुणे यांनी दिलेले आदेश)** |
| ५९ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर साो, यांचे मान्यतेने.
दिनांक : ०८ / ०३ /२०१६.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ५८** **दिनांक : ११ /०३/२०१६.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षामध्ये मुलभूत अनुदानाच्या प्राप्त झालेल्या पहिल्या हप्त्या अंतर्गत नियोजन करणेबाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- दिनांक ०७/०३/२०१६ रोजी मे.राष्ट्रीय हरीत लवाद, पुणे यांनी दिलेले आदेश.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, मा.केंद्र शासनाच्या चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार ५० टक्के घनकचरा व्यवस्थापन कामाकरीता खर्च करण्यासाठी प्राप्त झालेल्या व प्राप्त होणाऱ्या निधीतुन हाती घ्यावयाचे कामास प्रशासकीय मंजुरी देणेबाबत प्रस्ताव दि.१६/११/२०१५ रोजी मा. महासभेकडेस प्रशाकीय मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. सदर बाबत दि. १६/०३/२०१६ रोजी होणा-या मा. महासभेपुढेस सदरचा विषय घेण्यात आला आहे. मा. राष्ट्रीय हरीत लवाद यांचेकडेस बुरुडगांव येथील कचरा डेपो संदर्भात दावा दाखल आहे.

सदर बाबत दि.०७/०३/२०१६ रोजी मा. राष्ट्रीय हरीत लवाद यांचेकडेस झालेल्या सुनावणीमध्ये महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन करीता १४ व्या वित्त आयोगामधील प्राप्त झालेल्या अनुदानामधून हाती घ्यावयाच्या कामास प्रशासकीय मान्यता बाबत कार्यवाही २ दिवसात करुन पुढील तारखेस (दि.१६/०३/२०१६ ) प्रतिज्ञापत्र सादर करणे बाबत आदेशीत केले आहे. मा. महासभेकडेस सादर केलेल्या प्रस्तावामध्ये खालील प्रमाणे बांबीचा समावेश आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | अंदाजे खर्च लाखात |
|---|---|---|
| १ | कचरा वाहतुकी करिता ट्रान्सफर स्टेशन विकसित करणे | ५० लाख |
| २ | बुरुडगांव सर्वे नं.३४ या ठिकाणी संरक्षण भित्त बांधणे | ८१ लाख |
| ३ | बुरुडगांव सर्वे नं.३४ या ठिकाणी कचरा साठवणुक करीता मान्सुन शेड उभारणे | ७४ लाख |
| ४ | बुरुडगांव सर्वे नं.३४ या ठिकाणी अतर्गत रस्ते विकसित करणे | २४ लाख |
| ५ | सावेडी सर्वे नं.२८९ या ठिकाणी संरक्षण भित्त बांधणे | ८९ लाख |
| ६ | सावेडी सर्वे नं.२८९ या ठिकाणी मान्सुन शेड विकसित करणे | ९७ लाख |
| ७ | सावेडी सर्वे नं२८९ या ठिकाणी अतर्गत रस्ते विकसित करणे | २२ लाख |
| ८ | सावेडी सर्वे नं२८९ या ठिकाणी १०० मे.टन क्षमतेचा खत प्रकल्प उभारणे | ५० लाख |
| ९ | कचरा संकलन व वाहतुकीकरीता ४.५ घन मीटर क्षमतेचे १० कंटेनर व २.५ घन मीटर क्षमतेचे १० कंटेनर खरेदी करणे | १५ लाख |
| १० | बुरुडगांव सर्वे नं.३४ या ठिकाणी सॅनिटरी लैंडफिल्ड साईट तयार विकसित करणे | १५० लाख |
| ११ | सावेडी सर्वे नं.२८९ या ठिकाणी सॅनिटरी लैंडफिल्ड साईट तयार विकसित करणे | १८० लाख |
| १२ | बुरुडगांव सर्वे नं.३४ या ठिकाणी कचरा डेपो भोवती हरीत पट्टे विकसित करणे | १५ लाख |
| १३ | सावेडी सर्वे नं.२८९ या ठिकाणी कचरा डेपो भोवती हरीत पट्टे विकसित करणे | १५ लाख |
| १४ | बुरुडगांव सर्वे नं.३४ या ठिकाणी विद्युत व्यवस्था व पाण्याची व्यवस्था करणे | ३५ लाख |

| | | |
|---|---|---|
| १५ | सावेडी सर्वे. न. २८९ या ठिकाणी विद्युत व्यवस्था व पाणी व्यवस्था | ४० लाख |
| १६ | अहमदनगर महानगरपालिका हद्दी मध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे खाजगी यंत्रणेमार्फत संकलन व वाहतुक करणे. | १०० लाख |
| १७ अ | बुरुडगांव सर्वे नं.३४ या ठिकाणी कच-यावर प्रक्रिया करणे करीता प्लॅट फॉर्म विकसीत करणे . | ४० लाख |
| १७ ब | सावेडी स. नं. २८९ या ठिकाणी कच-यावर प्रक्रिया करणे करीता रिसिव्हिंग प्लॅट फॉर्म विकसीत करणे | ४५ लाख |
| १८ | वडगांव गुप्ता रस्ता ते पोखर्डी शिवा वरील सावेडी सर्वे नं.२८९ या कचरा डेपो पर्यंत जाणारा रस्ता विकसित करणे | ७५ लाख |
| | एकुण:- | ११५७ लाख |

वरील विषय हे घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया व विल्हेवाटशी निगडीत आहेत. सदर बाबत मे. राष्ट्रीय हरीत लवादाकडेस दि.१६/०३/२०१६ पुर्वी वरील विषयाबाबत प्रशासकीय मान्यता घेवून कालबध्द आराखडा बाबत सविस्तर प्रतिज्ञा पत्र सादर करणे आवश्यक आहे. यासाठी तातडीने महासभेकडेस सदरचा विषय मंजुरी होणे आवश्यक आहे. तरी सदर बाबत वरील प्रमाणे विषय प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेणे करीता मा. शासन निर्णय क्र.टिएफसी ८०१५/प्र.क्र.१०६/नवि-४ दिनांक ०३/०८/२०१५ नुसार १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार प्राप्त झालेल्या अनुदानामधून वरील प्रमाणे कामांना प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत व तसेच सदर बाबत मा. राष्ट्रीय हरीत लवादाकडेस दि.१६/०३/२०१६ पुर्वी प्रतिज्ञा पत्र सादर करावयाचे असल्याने मा. महासभेकडेस प्रस्ताव सादर करणे बाबत सविनय सादर.

यावर उपायुक्त (कर) श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, प्रस्तावित नमूद प्रस्ताव दि.१६/११/२०१५ रोजी मा.महासभेपुढे पाठविणेत आला आहे. परंतू काल दि.०८/०३/२०१६ रोजी NGT पुणे येथे झालेल्या सुनावणीत सुमारे ३११ महिने महासभेत विषय होवू न शकल्याने दिनांक १६/०३/२०१६रोजी पूर्वी विषय मा.महासभेत घेवून प्रतिज्ञापत्र दाखल करणेचे आदेश असलेने त्वरीत तातडीची महासभा घेवुन विषयी चर्चा होवुन निर्णय घेणे आवश्यक आहे. करीता प्रस्ताव मा.महासभेपुढे घेणेसाठी पाठविणेचे आदेशार्थ सादर.

यावर अतिरिक्त आयुक्त श्री.विलास वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, उपरोक्त सविस्तर अहवालानुसार व दिनांक ०७/०३/२०१६ रोजी NGT, पुणे येथे झालेल्या सुनावणी प्रमाणे तातडीची बाब म्हणून सदर विषय प्राधान्याने घेणे गरजेचे आहे. मागील वेळी दिनांक ११/०२/२०१६ रोजी झालेल्या सुनावणी वेळी १५ दिवसाच्या आत बुरुडगांव येथील व सावेडी घनकचरा प्रकल्पा बाबत प्रस्तावित केलेल्या अनु.क्र.१ ते १८ रक्कम रु.११.५७ लाख कामाबाबत निर्णय घेणे बाबत निर्देश दिलेले होते. निर्णय न घेतल्यामुळे न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे. पुढील सुनावणी दिनांक १६/०३/२०१६ रोजी ठेवलेली आहे. तरी प्रशासकीय मान्यता देण्या बाबतची कार्यवाही त्यापूर्वी करणे आवश्यक आहे. तरी सदर कामी तातडीची महासभा घेणे कामी मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त श्री.विलास ढगे साहेब, यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर श्री.अभिषेक कळमकर साहेब यांचा अभिप्राय की, नगरसचिव, मा.स्थायी समिती सदस्य यांनी पत्र देवून केलेल्या मागणी नुसार प्रस्ताव मा.खास सभेपुढे ठेवा.

**चर्चा :-**

**मा.महापौर साहेब :-** कोरम झाला असेल तर सभेस सुरुवात करावी. विषय वाचा.

**मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :-** घनकच-याबाबत प्रशासन सिरीयस आहे का ? घनकच-याकरीता कमिटी स्थापन केली. त्याची बैठक झाली घेण्यात येत नाही. घनकचरा कमिटीच्या बैठका का होत नाही. प्रत्येकवेळी हरीत लवाद आदेश देते नंतर आपण सुरुवात करतो. आदेशाची वाट का पहावी लागते. घनकचरा प्रकल्पाचे काम जिल्हाधिकारी कडे गेले. घनकचरा विभाग प्रमुखाबाबत मंत्रालयामध्ये चर्चा झाली ती काय झाली, तसेच माझ्या

वॉर्डला १ ट्रॅक्टर येतो. अहमदनगर शहरात कचरा वाढत आहे. घनकचरा व्यवस्थापना बाबत स्पष्टीकरण द्या प्रत्येक वेळी हरीत लवादाने सांगीतल्यावर कार्यवाही करायची.

**मा.आयुक्त साहेब :-** मा.सदस्यांनी उपस्थित केलेले ब दुरुस्ती मुद्दे व विचार करण्याजोगे आहेत. २ गोष्टी आहेत. घनकच-या बाबत दिर्घकालीन नियोजन करणे आवश्यक होते. ते कमी पडले ही वस्तुस्थिती मान्य करावी लागेल. दुरगामी नियोजन न केल्यामुळे आणि दुसरे म्हणजे निधी उपलब्ध नसने हे आहे. घनकचरा समितीची बैठक निघाली नाही. त्याचा वैधानिकते बाबत मत व्यक्त करणे योग्य नाही.

**मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :-** वैधानिकते बाबत आधीच पहायला पाहिजे. तसेच आपण पैशाच्या उपलब्धतेचा मुद्दा काढला पण या करीता पैशाची अडचण नाही. इच्छा शक्ती पाहिजे.

**मा.श्री.शेख नजीर अहमद अ :-** महानगरपालिका कमी का पडली.

**मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :-** हे सर्व मुद्दे आधी पहा.

**मा.महापौर साहेब :-** सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे थोडक्यात नेमके उत्तर अपेक्षीत आहे. आज उपलब्ध साधन सामग्रीचे कसे व्यवस्थापन करणार.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** मा.आयुक्तांनी सांगीतल्या प्रमाणे ती वैधानिक आहे का नाही याचा खरच खुलासा आधी करायला पाहीजे. या समितीला विश्वासात घेणे आवश्यक आहे. या समितीत कोणकोण आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** ज्या ठरावाव्दारे समिती गठीत केली त्या ठरावाचे सविस्तर टिपण येत्या महासभेत ठेवण्यात येईल.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** मग आजच्या सभेत हा घनकच-याचा विषय घेण्यात काय अर्थ. समितीचा अध्यक्ष कोण आहे.

**मा.महापौर साहेब :-** विभागाने माहिती द्या.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** आयुक्त साहेब आपण होतात ना त्या सभेस.

**मा.आयुक्त साहेब :-** मौखिक माहिती सांगीतल्यास चुक होवू शकेल लिखीत माहिती सादर करतो.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** हा विभाग कोणाकडे आहे.

**श्री.मेहेत्रे घनकचरा विभाग प्रमुख :-** माहिती मागवली आहे.

**मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :-** मी ३ प्रश्न विचारले होते. त्यापैकी या राहिलेल्या दोन प्रश्नांची ट्रॅक्टर डिझेल चोरी व कर्मचारी व्यवस्थापना बाबत माहिती द्या.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** कचरा तरी सर्व उचलला जातो का ?

**मा.महापौर साहेब :-** बोरुडे साहेबांच्या प्रश्नांची उत्तरे द्या.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** प्रस्तावातील ९ मध्ये दुरुस्ती करुन नंतरची संख्या वाढवावी. हे १० कंटेनर कशे पुरतील.

**मा.श्री.गणेश भोसले :-** मा.स्थायी समिती मध्ये किती कंटेनर मंजूर केले.

**मा.आयुक्त साहेब :-** १०० कंटेनर.

**मा.श्री.विजय गव्हाळे :-** प्रत्येक वॉर्ड मध्ये ५ कंटेनर ठेवा.

**मा.महापौर साहेब :-** १ वॉर्डाचे ५ कंटेनर ठेवण्याची व्यवस्था पहा.

**मा.सौ.मालनताई ढोणे :-** कंटेनर नाही. कुंडया नाही. कचरा कोठे टाकायचा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** कुंडया, कंटेनर नाहीतर कचरा कुठे टाकणार. मा.स्थायी समितीमध्ये ठराव केला त्याची अंमलबजावणी का होत नाह. कोठी रस्तयावर कचरा टाकण्याची क्लीप दाखवली हे १० कंटेनर कोठे ठेवायचे श्री.मेहेत्रे सांगा. आमच्या स्थायी समितीच्या ठरावाचे काय ?

**श्री.मेहेत्रे घनकचरा विभाग प्रमुख :-** दरवर्षी कचरा कंटेनर खरेदी करता येईल असा निधी येतो.

**मा.सौ.मनिषा बारस्कर :-** गाडी येते तो कर्मचारी कचरा उचलायला गाडीच्या खाली उतरत नाही. महिलांशी उध्दट बोलतात.

**मा.महापौर साहेब :-** संबंधित कर्मचा-यांना सक्त सूचना द्या.

**मा.सौ.मनिषा बारस्कर :-** गाडी बंद केली तर चालू होत नाही असे सांगतात. कचरा, पाणी सगळयाच सेवा अपु-या मग टॅक्स कशाचा भरायचा. सारखी गाडी थांबवणार नाही असे कर्मचारी सांगतात. महिलांना उध्दट बोलतात. गाडी नियमित येत नाही.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** कंटेनरचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. त्यावर कार्यवाही चालू आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** आपल्याकडे फक्त २०-२१ गाडया आहेत. कर्मचारी तरी काय करतील. कंटेनर ठेवत नाही तोपर्यंत काहीच नाही. आपण आजची सभा अर्जंट का बोलवली. तर कोर्टाने सांगीतले म्हणून. या घनकचरा विभागावर कोणता अधिकारी नेमण्याची तरतुद आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** कोण अधिकारी पाहिजे ते मला आत्ता सांगता येणार नाही. पण कंटेनर कमी का खरेदी केले. कंटेनरशिवाय कचरा उचलता येणार नाही. असे सांगीतले ते बरोबर आहे. पण १४ वा वित्त आयोगाचा निधीहून ५० टक्के रक्कम घनकच-यावर खर्च करायचा आहे. त्याकरीता नाव्हेंबर २०१४ मध्येच प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेकडे दिला. दुसरा मुद्दा आपण १०० कंटेनर खरेदीचा महानगरपालिकेने मान्यता दिल्याशिवाय कंटेनर खरेदी करता येणार नाहीत.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** हे हरीत लवाद काय आहे हे सांगा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** दिनांक ११-२-२०१६ रोजी NGT ने जो आदेश दिला १ महिना काय केले. प्रशासनाने काय केले.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** NGT कडे कोणीतरी तक्रार केल्या शिवाय आदेश दिले का ?

**मा.श्री.अनिल शिंदे :-** १० कंटेनर घेवून काय करता. याला १०० कंटेनर घेता म्हणता पण प्रत्येक कामाला उशीर करता. पण १०० कंटेनर घेण्याचे रुलिंग द्या

**मा.श्री.गणेश भोसले :-** मा.आयुक्त म्हणाले आम्ही ठराव केला आहे तो ठराविक निधीचा नाही. आम्ही १२,१३,१४ वा वित्त आयोग किंवा कोणत्याही उपलब्ध निधीतून कंटेनर घ्या असा ठराव केला आहे. कंटेनर कुंडयांशिवाय काही कचरा हटणार नाही.

**मा.महापौर साहेब :-** १-१ सदस्यांनी बोला.

**मा.श्री.गणेश भोसले :-** कोर्टाने आदेश दिला आहे. जेथे २-४ लाख लोकसंख्येला पर्यावरण इंजिनियर नेमला पाहिजे हे तुमचे काम आहे. ते डॉक्टरचे, आरोग्याधिकारी यांचे काम नाही. तेथे त्या योग्यतेचा अधिकारी नेमा. इलेक्ट्रीकचा माणूस इलेक्ट्रीक विभागाकडेच चांगले काम करेल. टी.पी. चा कर्मचारी टी.पी.मध्ये राहीला पाहीजे.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** तुम्ही या पात्रतेचा माणूस नेमला कां ?

**मा.महापौर साहेब :-** मा.आयुक्त साहेब तुम्ही नेमला का ?

**मा.श्री.गणेश भोसले :-** १९ जानेवारी २०१६ रोजी कोर्टाने त्या अधिका-यावर कारवाईचे आदेश दिले ते केले नाही.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** खेदाने सांगावे वाटते की, स्थायी समितीच्या सभापतीच्या सूचना अंमलात आणल्या जात नाही.

**मा.श्री.गणेश भोसले :-** आम्ही शाळेतल्या जागेचा १ ठराव केला. त्या ठरावावर मुख्याध्यापक सांगतो की, स्थायी समितीचा ठराव विखंडीत करा.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** अशा मुख्याध्यापकावर कारवाई करा.

**मा.आयुक्त साहेब :-** घनकचरा वाहतुक करीता २००९-२०१० करीता टेंडर मागवणेचा ठराव झाला. वेळोवेळी निविदा मागवल्या. प्रक्रीया पूर्ण झाल्या नाही. शेवटची निविदा २०१४ मध्ये बजेटच्या ठरावात प्रभागनिहाय टेंडर मागवावेत अशी चर्चा झाली. प्रत्यक्षात गतवर्षी १ वर्षातच प्रभागात निविदा मागविली. पण ती स्थायी समितीकडे पाठवली नाही. ती मी अवलोकन केले. बजेट महानगरपालिकेचा ठराव व चर्चेनुसार शहराकरीता निविदा मागवली परंतु १ प्रभागाकरीता निविदा मागवली त्या निविदेचा निविदाधारक कोर्टात गेला. ती याचिका फेटाळली. त्यानंतर ३ वेळा निविदा मागवल्या.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** नाव सांगा.

**श्री.मेहेत्रे घनकचरा विभाग प्रमुख :-** सुमित एन्टर प्रायजेस. आणि नाकारल्या त्या (१) अश्वमेघ व (२) बीव्हीजी एन्टर प्रायजेस या होत्या.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** चांगले काम करणा-याला आपण काम दिले नाही.

**मा.श्री.अभय आगरकर :-** कोर्टाने काय सांगीतले ते वाचा या लवादाने आपली बॉडी सुपरसीड करावी असे आदेश दिले होते.

**मा.श्री.गणेश भोसले :-** या निविदा कशा चुकल्या ते आणि कंटेनर १०० खरेदी करणेची माहिती द्या. आधि शहर स्वच्छ कसे करणार याची माहिती मला लेखी द्या.

**मा.महापौर साहेब :-** स्थायी समितीमध्ये मंजूर झालेला १०० कंटेनरचा विषय त्वरीत करुन घ्या.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** दि.१७/०३/२०१६ रोजी NGT कडे असलेल्या तारखे संदर्भातील NGT कडे काय तक्रार केली व तक्रारदार कोण ते सांगा लवादाचे डायरेक्शन काय आहेत.

**मा.महापौर साहेब :-** लवादापुढे जे अधिकारी गेले ते सांगतील.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** फक्त ऑर्डर वाचा.

**श्री.मेहेत्रे घनकचरा विभाग प्रमुख :-** मी ऑर्डर वाचतो ऑर्डर वाचली.

मा.श्री.किशोर डागवाले, मा.श्री.गणेश भोसले मराठीत सांगा.

**श्री.मेहेत्रे घनकचरा विभाग प्रमुख :-** बुरुडगांव सर्व्हे नं. ३४ येथील नागरीक श्री.कुलट व इतर यांनी २००२ साली दावा केला. हा २०१३ पर्यत हाय कोर्टाकडे पेंडींग होता. २०१३ साली NGT या मा.हायकोर्टाच्या दर्जाच्या कोर्टात वर्ग झाली.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** आत्ताची ऑर्डर सांगा.

**श्री.मेहेत्रे घनकचरा विभाग प्रमुख :-** तक्रारदार, एमपीसीबी व महानगरपालिका यांची जॉईन्ट व्हीजीट बुरुडगांव येथे झाली. दि.५/२/२०१३ ला त्यावर रिपोर्ट दिला की, फक्त प्रोजेक्ट उभारला आहे. डेपोवरील प्लॅस्टीक उडून इतरत्र जाते. NGT ने सांगीतले की यावर सविस्तर अहवाल द्या. आम्ही NGT ला सांगीतले आम्ही १६ ला महासभेची बैठक बोलावली आहे. पण NGT ने हे मान्य केले नाही. २ दिवसात ॲफेडेव्हीट देण्यास सांगीतले. म्हणुन आज त्वरीत सभा बोलवावी लागली.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** २००७ पासून डायरेक्शन दिले आहेत. २००४-२००५ मध्ये कचरा डेपो हलवला. त्या जमिनीचा मालक मुथा याकडून बांधलेली कंपौंड वॉल आजही आहे. कंम्पौंड वॉल दुरुस्तीचे बील सादर झाले. या वॉलचा खर्च २०१४ पर्यंत खर्च करता आले. त्यामुळे १ ते दीड कोटी खर्च केले. कुलकर्णी साहेब यांनी २२ लाख दुरुस्ती करीता खर्च केला आहे. मला याचे एस्टीमेंट दाखवा.

**श्री.मेहेत्रे घनकचरा विभाग प्रमुख :-** ८१ लाख चे ब्लॉक एस्टीमेंट केले आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** भिंत असतांना दुरुस्ती व उभारणी का करतो.

**मा.महापौर साहेब :-** भिंतीला ८१ लाख का खर्च करतो.

**श्री.मेहेत्रे घनकचरा विभाग प्रमुख :-** भिंती आहे हे बरोबर. तेथे केलेला खर्च वाया जाणार नाही. ते मटेरियल दुसरीकडे वापरता येईल.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** त्या भिंतीची आजही भिंत ९ फुट आहे.

**श्री.मेहेत्रे घनकचरा विभाग प्रमुख :-** भिंत बांधण्याची एमपीसीबी ने शिफारस केली आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** प्लॅस्टीक, काच, बाटली याचा फक्त वेगळे ठेका करण्याचा आहे. भिंतीची गरज नाही. २ ठिकाणचे टेंडर निघाले. टी.पी.ला बोलवा आपली अट होती कंम्पौंड भिंत बांधल्या शिवाय टीडीआर देता येणार नाही. खरेदी करता येणार नाही. गौतम बोरा यांनी आत्ताशी वॉल कंम्पौंड बांधली. आता तेथे ८१ लाख खर्च का करता. खरेदी दारांनी वॉल कंम्पौंड बंधली का ? यांना टीडीआर दिला आहे यापुर्वी त्यांनी वॉल कंम्पौंड बांधणेचे अटीचे पत्र दिले होते आणि कंम्पौंड वॉल झालेवरच खरेदी झाली आहे.

**श्री.बल्लाळ, नगररचना विभाग :-** या जागेला पुर्व दक्षिण व उत्तर ठिकाणी वॉल कंम्पौंड आहे व पश्चिमेला तार कंम्पौंड आहे. त्यामुळे तेथे नव्याने भिंत बांधण्याची गरज नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** रस्ता त्याच्या बाजूने आहे तो ZP ने केला आणि आता तेथे भिंत का बांधली तेथे भिंत आहे का.

**श्री.बल्लाळ, नगररचना विभाग :-** भिंत आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** मग ही भिंत बांधायचा खर्च कसा. वालगुडे साहेब पहाणी केली ते सांगा.

**अति.आयुक्त श्री.विलास वालगुडे :-** तेथे खडी होती.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** रस्त्याचे काम काही महिन्यापुर्वी झालेले आहे व ७५ लाखाचे बील त्या आधीच्या ZP च्या ठेकेदाराने घेतले. आता परत तेच बील काढणार मान्सुन शेड म्हणजे काय ते माहित नाही. त्याची जागा किती ते माहित नाही. आजची स्थिती काय माहिती नाही. श्री.मेहेत्रे साहेब तुम्ही उत्तर देवू नका मी सिव्हील इंजिनियरला विचारीन ते सांगतील. बुरुडगावला १ कोटी ८५ लाखाचे शेड आहे. अट क्र.१० वर पुन्हा १.५० कोटी मान्सुन शेड बांधायची कचरा प्रक्रीया करणारा जाधव बरोबर २ करारनामे केले. २.५० मे.टन कच-यावर प्रक्रीया करुन काच व प्लॅस्टीक, लोखंड व प्रक्रीया न केलेला कचरा विल्हेवाट ठेकेदाराने लावायची अशी अट आहे. तुम्ही २० एकरला कंम्पौंड दाखवले. २ करारनामे का पाहिले नाही. ही सगळी प्रक्रीया ठेकेदाराने करायची आहे. तरी तुम्ही आता ही काम करायचे विषय घेता हे कसे आपण ठेकेदाराला १६ लाख दरमहा देतो. शेडवर छप्पर आले. तर जमीन कोटींग कशाला करायची त्यावर कच-याची विल्हेवाट त्यानेच लावायची अ.क्र.४ मध्ये लिहीले बुरुडगांव कचरा डेपो मध्ये रस्ते विकसीत करणे २४ लाख रुपये पण तेथे खडीचे रस्ते आजही आहे.. तसेच बुरुडगांव कचरा डेपो कंम्पौंड वॉल बांधणे २००९ मध्ये ठेकेदाराने काम केले त्याची रक्कम १२ लाख हे अकौंड विभागातून आणले आहे. सिध्दी विनायक मजूर संस्था खडीकरण करणे२०१० मध्ये घेतले आहे. तेथेच बुरुडगांव कचरा डेपो अंतर्गत रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण ४ लाख २०१० मध्ये नंतर ११ व्या महिन्यात जगदंबा मजूर त्याच रस्त्याला खडीकरण २०१४ ला परत रुंदीकरण मजबूतीकरण १४ लाख कचरा डेपोत ७ लाख रुपयांची गटार आहे. ती दाखवा. परत तेथेच सर्व्हे नं.३४ पर्यंत रस्ता मजबुतीकरण ४४ लाख आणि आता तेथेच ९७ लाख बील हा जनतेचा पैसा आहे. याचे ढोबळ एस्टीमेट तयार करता. आता सावेडी कचरा डेपो मध्ये मान्सून शेड बांधणेस प्रस्ताव आला आहे. आणि आम्हाला लवादाची व कोर्टाची भिती दाखवत आहेत. कोर्टाने असे आदेश दिलेले आहेत काय. दाखवा कोर्टाचे काय आदेश झालेले आहे ते दाखवण्यांत आलेले नाहीत. फक्त मुंबई करीता आदेश आहेत, की सर्व अपार्टमेंट मधील कच-याची विल्हेवाट लावण्याची प्रक्रीया अपार्टमेंट मध्ये होत नाही तोपर्यंत बांधकाम परमीशन देवू नये. हरीतपट्टे १५ लाखाचा प्रस्ताव आहे. पण ही सुध्दा अट जाधव ठेकेदाराच्या करारात आहे. सावेडी येथे कचरा १ टन आला नाही. व १०० टन कचरा डेपो विकसीत करण्यासाठी १.८० कोटी रुपयांचे काम लिहीता अट क्र.२६ नुसार हरीतपट्टे विकसीत करणे करीता अट आहे जाधवच्या करारात या अटी असतांना कोणीही न पहाता सभागृहा समोर विषय आणता. पुढचा मुद्दा असा आहे. विद्युतीकरण, पण विद्युतीकरण असल्याशिवाय तेथे प्रकल्प कसा चालू आहे.

**श्री.मेहेत्रे घनकचरा विभाग प्रमुख :-** रुरलचा कनेकशन मेन सर्व्हीस वर जोडायची

**मा.श्री.दिप चव्हाण :-** अंतर्गत विद्युतीकरण ठेकेदाराने करायचे आहे अट क्र.४ हे ४.५ कोटी मध्ये आहे. तुम्ही हे काम घेतले. तसेच कचरा संकलन व वाहतुक १ कोटी तरतूद ऐवजी आताठेकेदाराला किंती कोट देतो. ठेकेदाराला देणेकरीता ७ कोटी वर्ग केले आहेत. मग हे १ कोटी कशासाठी. तसेच प्रभागनिहाय खर्च अजुन दिसुन येतो. एकुण किती झाला तसेच प्लॅट फॉर्म विकसीत करणे अशी अट क्र.६३ आहे. करारात त्याला याकरीता ८ लाख दिले आहेत. हे सगळे पैसे १२-१३ व्या वित्त आयोगातून घेतले आहेत.

**मा.श्री.गणेश भोसले :-** सावेडी कचरा डेपो अंतर्गत रस्ते विकसीत २२ लाख व मुलभुत मध्ये सावेडी कचरा डेपोकडे जाणारे रस्ते विकसीत करणे २६ लाख असे दोन्हीकडे घेतले आहेत.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** हे पत्र घ्या हे ११ कोटी रुपयांची कामे बोगस बील देणे करीता आणले आहे. यापुर्वीची कामे झाली नाहीत असे यावरुन दिसते. काम पुर्वी तरी झाले किंवा आता नाही. या विषयाला डिम्ड परमिशन खाली का ॲफेडेव्हीट दिले नाही. आम्ही कंटेनर खरेदी करता ५(२)(२) प्रमाणे प्रकरणे पाठवले. त्यावेळी ३५ लाख रुपये पडून होते. आम्ही ठराव केला त्याचे टेंडर का नाही आले. मग गणपती, मोहरममध्ये ५० लाखाचे रस्त्याचे कसे टेंडर नसतांना केले. १०० कंटेनरचा विषय स्थायी समितीमध्ये होतो. आणि १० कंटेनरचा विषय

महत्वाचा म्हणून मा.महासभेत आणायचा. आम्ही १२,१३,१४ व्या वित्त आयोगातून खर्च करण्यास सांगितले. मी आता पत्र देत आहे हे सगळे खोटे काम आहेत. याची चौकशी करा दोषींवर करवाई करा. नंतरच हे विषय आणा. २ महिन्यात मशिनरी बसवली तर तुम्ही ठेकेदाराला बक्षीस देता. बुरुडगांव व सावेडी सि.नं.२८९ करीता केलेले घनकचरा व्यवस्थापनसाठी केलेल्या करारनाम्या मधे अटी शर्तीमध्ये तफावत आहे. ह्या विषयाला माझा विरोध आहे. कारण हे सगळे बोगस व चुकीचे मांडले आहे.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** हा विषय अत्यंत गांभिर्याने घेण्याचा विषय आहे. या घनकच-या करीता आपण समिती नेमली होती त्याची माहिती द्या

**श्री.मेहेत्रे घनकचरा विभाग प्रमुख :-** अध्यक्ष-आयुक्त, सदस्य-श्री.संपत बारस्कर, दिनांक २८/०८/२०१५ रोजी बैठक झाली.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** हा ठराव कधी झाला.

**श्री.मेहेत्रे घनकचरा विभाग प्रमुख :-** दिनांक १८/०२/२०१५ रोजी हा समितीचा ठराव होता.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** ही समिती वैधानिक आहे का नाही हा प्रश्न आयुक्तांना आता का पडावा. या समितीचे काम झाले असते तर चांगले काम झाले असते. समिती जर अस्तीत्वात आहे तर हा विषय समितीपुढे का आणला नाही. हे समितीपुढे न आणण्यास आपण जबाबदार आहात. रस्ता तेथे आहे. वॉल कंम्पौंड आहे तरी तेथे रस्ते वॉल कंम्पौंड, करता हे गैरकाम आहे. NGT चा निर्णय आहे. तो चांगला आहे. जर हा विषय नामंजूर झाला महानगरपालिकेला दंड झाला तर त्याला जबाबदार कोण. एखाद्या इंजिनिअरने काम न करता पेमेंट काढले तर त्याच्यावर कारवाई केली जात नाही. तो कोर्टात जातो. सभेत विषय घेवूनये असा आदेश येतो. मुलभूत मधला रस्ता पुन्हा यामध्ये घेतला जातो. गावांत कंटेनर ठेवायला जागा नाही. या निधीतुन छोट्या घंटा गाडया घ्या. घराघ्ररातून कचरा गोळा करा कंटेनर मुक्त, कुंडी मुक्त नगरचे स्वप्न पहा. या कामाला आम्ही विरोध करणार नाही पण कामांची चौकशी करुनच कामे करा. कमिटीमध्ये या कामांची चर्चा झाली असती तर या गोष्टी आधीच उघड झाल्या असत्या. आमच्या समोर समितीचा अभिप्राय येणे अपेक्षीत होते. आपण १ मिटींग घेता आणि नंतर आपल्याला आकलन होते की समिती कायदेशीर आहे की नाही. आमचा या प्रस्तावाला विरोध नाही. पण जी कामे यापुर्वी झाली आहेत ती कामे वगळून करण्यात यावा.

**मा.श्री.सातपुते :-** मार्च महिना आहे. लोकांची घरपट्टी भरण्याची मानसिकता आहे. तरी ७५ टक्के शास्ती माफीचा निर्णय घेण्यात यावा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** हे आयुक्तांचे अधिकार आहेत.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** लोकांचे घरा समोर ढोल वाजवू नका.

**मा.श्री.जाधव :-** ज्यांनी १ जानेवारी २०१६ पासून भरले त्यांचेही समायोजन करा.

**मा.आयुक्त साहेब :-** गेल्या ४ वर्षापासुन वर्षा अखेरीस सवलत देण्यात येते. परंतू त्या सवलतीचा करदाते लाभ घेत नाहीत. कर सवलतीत वाढ झाली. मी जुलै मध्ये रुजू झाल्यावर मा.महापौर यांचे दालनात चर्चा होवून शास्ती माफीबाबत निर्णय झाला. मे-जुन मध्ये माफी देवूनही उपयोग होत नाही. ४ वर्षे सवलत देवून काय वसूली झाली याचे विवेचन करुन ७५% कर सवलत ऑगष्ट पासुन ३.५ महिने दिली. जर फक्त वर्ष अखेरीस शास्तीमाफी दिली तर वर्षभर भरणा-यांवर अन्याय होतो. अशी कारणे देवुन शास्ती माफी योजना दिली. त्यामुळे महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचा विचार करुन आता शास्ती माफी देणे योग्य होणार नाही.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** तुम्ही शास्ती माफी चुकीच्या वेळी दिली.

**मा.श्री.गणेश भोसले :-** आता माफी दिली तर वर्षभर भरणा-यांवर अन्याय होतो.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** ११ कोटीची बोगस कामे करतांना आर्थिक स्थीती दिसत नाही.

**मा.श्री.अभय आगरकर :-** पुणे महानगरपालिकेचे उदाहरण आहे त्यांनी अशी माफी दिली त्यावेळी त्यांची वसूली वाढली आहे. मार्च शेवटचे १५ दिवस द्या.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** पुर्वी झगडे मॅडम होत्या त्यांनी जप्ती केली.

**मा.महापौर साहेब :-** जसे मा.आयुक्त यांनी सांगीतले की पुर्वी शास्ती माफी दिली आहे. मा.सभागृहातील मागणी तसेच थकबाकीचे प्रमाण पाहून १६ तारखेच्या सभेत निर्णय घेवू.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** १६ तारखेपासुन शास्ती माफी लागू करा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** कोणत्या कायद्यानुसार शास्ती माफी करीता महापौरांचे पत्र देणे आवश्यक आहे. आपण आदेश करा.

**मा.महापौर साहेब :-** १६ तारखेपासून शास्ती माफी देण्याबाबत विचार करण्यांत यावा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** जे रेग्यूलर भरतात त्यांना काहीतरी फायदा द्या.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** ज्यांनी रेग्यूलर भरले त्यांचे समायोजन करा.

**मा.श्री.अभय आगरकर :-** हा अजेंडयावरचा विषय नाही. त्याचे उत्तर देण्याचे काम मा.आयुक्तांनी करावे.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** हे सभागृहाच्या चर्चे अंती झाले असल्याने मा.आयुक्तांनी शास्ती माफी निर्णय घोषीत करा.

**मा.आयुक्त साहेब :-** शास्ती माफी मध्ये वैयक्तीक माझे मत नाही. ज्या पध्दतीने आपण ही योजना ३.५ महिने राबवली त्या पध्दतीने महाराष्ट्रात कोठेही राबवली नाही. पुण्यातही आपले अनुकरण केले जात आहे. आत्ता जे आदेश काढले होते ते पदाधिकारी व महापौर यांचा मान ठेवून आदेश काढले होते. आता पुनःश्च तसे आदेश काढले तर ते लेखापरिक्षणाच्या दृष्टीने आक्षेपार्ह होईल असे मत आहे. जर सदस्यांनी लेखी निवेदन दिल्यास १६ तारखेच्या सभेत आयत्या वेळचा विषय घेवू.

**मा.श्री.अभय आगरकर :-** अनारसे साहेबांना बोलवा. अशी सूट २ वेळा देवू नये अशी तरतूद आहे का.

**मुख्यलेखापरिक्षक श्री.श्रीकांत अनारसे :-** कायद्यानुसार आयुक्त सक्षम आहेत.

**मा.श्री.अभय आगरकर :-** आपण टिपणी काढून पॉईन्ट काढा तपशील ठरवा. किती वर्षाचे थकबाकी बाबत ऑडीट पॉईन्टस आले आहेत का. आयुक्त साहेब सभागृहाचा मान ठेवून आपल्याला असलेला अधिकार वापरुन ७५% शास्ती माफी द्यावी हे जनतेसाठी करा. त्यामुळे तुमचीही वसुली वाढेल.

**मा.आयुक्त साहेब :-** आपण ऑडीटचा अभिप्राय घेतला. माझ्या टिपणीवर स्पष्ट अभिप्राय ऑडीटर यांनी द्यावा नंतर मी निर्णय देतो.

**मा.श्री.अभय आगरकर :-** मा.आयुक्तांना जर मा.महापौर आदेश देतात आणि त्याचे पालन होत नाही ही बाब चुकीची आहे.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** यापुर्वी मुख्यलेखापरिक्षक यांच्या अभिप्रायाची गरज नाही. पडली तर आता का पडली.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** महानगरपालिकेच्या हिताच्या गोष्टीची भुमिका मा.आयुक्त सांगतात. चारठाणकर साहेबांकडे चार्ज द्या मग वसुली बघा.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** श्री.अनारसे साहेबांचे मत का घेतले, तर मा.आयुक्तांनी ऑडीट पॉईन्ट चा विषय घेतला म्हणून. जीआयएस ची एजन्सी पळून गेली का ती कोठे गेली. त्यांनी काम केले नाही. आणि त्यांचे काम जनतेवर लादता का.

**मा.आयुक्त साहेब :-** आता जी चर्चा झाली. हा विषय अजेंडयावरचा नाही. माझ्या आदेशाच्या अटी-शर्तीचे उल्लंघन मी करणे उचीत समजत नाही. अन्यथा बोराटे साहेब यांनी सूचवल्या प्रमाणे माझेवर अविश्वासाचा ठराव घ्यावा. यापुढे मी सभागृहात उपस्थित राहू शकत नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** कलम ४४ नुसार प्रश्न विचारता येतात.

**मा.श्री.सचिन जाधव :-** दिप चव्हाण साहेबांचे, भोसले साहेबांचे, डागवाले साहेबांचे तसेच इतर सदस्य यांचे कौतुक करावे लागेल त्यांनी जे अभ्यासपूर्ण विषय मांडला ते कौतुकास्पद आहे. यात जे अधिकारी दोषी असतील त्यांचेवर कारवाई करावी. डागवाले साहेब यांनी ओला व सुका कचरा वेगळा साठवण्याच्या बाबत जे काम केले ते चांगले आहे. १६ तारखेच्या आत जो निर्णय घ्यायचा तो घ्यावा. त्याबाबत सभागृहावर ठपका ठेवला जावू नये. ही कामे कोणती घ्यावी हे प्रशासनाने ठरवले ते कोणत्याही सदस्यांनी ठरवले नाही.

**मा.श्री.गणेश भोसले :-** ही सर्व कामे NGT ने घ्यावयास सांगीतले आहेत काय.

**श्री.मेहेत्रे घनकचरा विभाग प्रमुख :-** कचरा विल्हेवाट व प्रक्रीया साठीची कामे घेण्यास सांगीतली आहेत. लॅण्डफिल चे काम डिस्पोझल करता आहे. १८ पैकी २ कामे कंम्पौंड वॉलची आहेत. जी कंम्पौंड वॉल काढायची आहे ती काढून मटेरियल दुसरीकडे वापरुन मोठी वॉल बांधता येईल.

**मा.श्री.गणेश भोसले :-** या कामापैकी जी करणे आवश्यक आहेत, यापुर्वी केली नाहीत तीच कामे करावीत उरलेल्या निधीत ढकलगाडया, कुंडया, कंटेनर, कॉम्पॅक्टर, डस्टबीन खरेदी करणे अशी कामे घ्यावीत.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** दिप चव्हाण यांचा आक्षेप आहे त्यानुसार जी कामे यापुर्वी झाली ती वगळून इतर घ्यावीत.

**मा.सौ.सुनिता फुलसौंदर :-** या निधीतुन बुरुडगांव रोड मोठा करुन दुरुस्त करावा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** हा रस्ता आपण घेतला आहे का कोठे.

**श्री.मेहेत्रे घनकचरा विभाग प्रमुख :-** हा रस्ता झेड पी ने टेंडर काढले आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** आपल्याला आणखी काही NGT दंड झाला.

**श्री.मेहेत्रे घनकचरा विभाग प्रमुख :-** तो जलनिस्सारणचा आहे.

**मा.श्री.श्रीकांत छिंदम :-** खा.दिलीप गांधी साहेब यांनी उड्डाणपुला करीता निधी आणला त्याबद्दल त्यांचा तसेच आमदार साहेब व महापौर साहेब यांचे अभिनंदन करण्याचा ठराव घ्यावा. तसेच महानगरपालिकेचे नविन निवडुन आलेले सदस्य श्री.गाडे साहेब व भोसले मॅडम यांचा सत्कार करावा.

**मा.श्री.अभय आगरकर :-** सन्माननीय सदस्यांनी चर्चा केली. NGT चा जो आदेश आहे त्याची पायमल्ली व्हावी असा उद्देश नाही पण जे आक्षेप घेतले त्याबाबत चौकशी करा. झालेली कामे वगळून कार्यवाही करा. मेहेत्रे साहेबांबद्दल संदेह नाही. परंतु चुकले तर ते सांगीतले पाहिजे. आयुक्तांनी निघून जाणे ही कृती कितपत योग्य आहे हे मी सांगत नाही. आपण चर्चेला ऐकणे तसेच आपली चूक होते का हे पहाणे असे अपेक्षीत आहे. ऑडीट आक्षेपाला उत्तर देतांना ऑडीटरची भुमिका महत्वाची आहे. मी विचारले आधी आयुक्ताने शास्ती माफी केली होती त्यावेळी ऑडीटरला विचारले नव्हते. परंतू त्यांनी केलेली कृती ही सभागृहाच्या मानाच्या दृष्टीने उचित नाही.

**मा.महापौर साहेब :-** घनकचरा व्यवस्थापनावर ५० टक्के खर्च करणेच्या दृष्टीने सभागृहाचा कल तसेच सभागृहामधील सविस्तर चर्चा विचारात घेता वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०१४-२०१५ व सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षासाठी प्राप्त निधी तसेच आगामी आर्थिक वर्षासाठी प्राप्त होणारा निधी विचारात घेवून प्रस्तावात नमुद केलेल्या कामासह घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत सर्व कामे करणे कंटेनर, कॉम्पॅक्टर, घंटागाडया, सायकल रिक्षा, ढकलगाडया, फायबर कुंडया आदी खरेदी करणे कामी ही सभा मान्यता देत आहे. तथापि सभागृहातील चर्चा पाहता सादर केलेल्या प्रस्तावातील कामांची आवश्यकता तपासुन व खातरजमा करुन मा.आयुक्त यांनी सदर कामाच्या निविदा मागविण्या बाबत पुढील कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट नुसार घनकचरा व्यवस्थापनावर ५० टक्के खर्च करणेच्या दृष्टीने सभागृहाचा कल तसेच सभागृहामधील सविस्तर चर्चा विचारात घेता वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०१४-२०१५ व सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षासाठी प्राप्त निधी तसेच आगामी आर्थिक वर्षासाठी प्राप्त होणारा निधी विचारात घेवून प्रस्तावात नमुद केलेल्या कामासह घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत सर्व कामे करणे कंटेनर, कॉम्पॅक्टर, घंटागाडया, सायकल रिक्षा, ढकलगाडया, फायबर कुंडया आदी खरेदी करणे कामी ही सभा मान्यता देत आहे. तथापि सभागृहातील चर्चा पाहता सादर केलेल्या प्रस्तावातील कामांची आवश्यकता तपासुन व खातरजमा करुन मा.आयुक्त यांनी सदर कामाच्या निविदा मागविण्या बाबत पुढील कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे.

घनकचरा व्यवस्थापनाचे काम नागरी सुविधेच्या दृष्टिने अत्यावश्यक सुविधा कामकाज असल्याने प्रस्तावानुसार नियोजनबध्द कार्यवाही होण्याचे दृष्टिने कालबध्द कृती कार्यक्रम आखणी करुन सदर प्रस्तावाची कार्यवाही करणेस देखील ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री.कुमार बबन वाकळे,

अनुमोदक - मा.श्री.संपत विजय बारस्कर,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ५८** **दिनांक : ११ /०३/२०१६.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षामध्ये मुलभूत अनुदानाच्या प्राप्त झालेल्या पहिल्या हप्त्या अंतर्गत नियोजन करणेबाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- दिनांक ०७/०३/२०१६ रोजी मे.राष्ट्रीय हरीत लवाद, पुणे यांनी दिलेले आदेश.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, मा.केंद्र शासनाच्या चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार ५० टक्के घनकचरा व्यवस्थापन कामाकरीता खर्च करण्यासाठी प्राप्त झालेल्या व प्राप्त होणाऱ्या निधीतुन हाती घ्यावयाचे कामास प्रशासकीय मंजुरी देणेबाबत प्रस्ताव दि.१६/११/२०१५ रोजी मा. महासभेकडेस प्रशाकीय मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. सदर बाबत दि. १६/०३/२०१६ रोजी होणा-या मा. महासभेपुढेस सदरचा विषय घेण्यात आला आहे. मा. राष्ट्रीय हरीत लवाद यांचेकडेस बुरुडगांव येथील कचरा डेपो संदर्भात दावा दाखल आहे.

सदर बाबत दि.०७/०३/२०१६ रोजी मा. राष्ट्रीय हरीत लवाद यांचेकडेस झालेल्या सुनावणीमध्ये महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन करीता १४ व्या वित्त आयोगामधील प्राप्त झालेल्या अनुदानामधून हाती घ्यावयाच्या कामास प्रशासकीय मान्यता बाबत कार्यवाही २ दिवसात करुन पुढील तारखेस (दि.१६/०३/२०१६ ) प्रतिज्ञापत्र सादर करणे बाबत आदेशीत केले आहे. मा. महासभेकडेस सादर केलेल्या प्रस्तावामध्ये खालील प्रमाणे बांबीचा समावेश आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | अंदाजे खर्च लाखात |
|---|---|---|
| १ | कचरा वाहतुकी करिता ट्रान्सफर स्टेशन विकसित करणे | ५० लाख |
| २ | बुरुडगांव सर्वे नं.३४ या ठिकाणी संरक्षण भित्त बांधणे | ८१ लाख |
| ३ | बुरुडगांव सर्वे नं.३४ या ठिकाणी कचरा साठवणुक करीता मान्सुन शेड उभारणे | ७४ लाख |
| ४ | बुरुडगांव सर्वे नं.३४ या ठिकाणी अतर्गंत रस्ते विकसित करणे | २४ लाख |
| ५ | सावेडी सर्वे नं.२८९ या ठिकाणी संरक्षण भित्त बांधणे | ८९ लाख |
| ६ | सावेडी सर्वे नं.२८९ या ठिकाणी मान्सुन शेड विकसित करणे | ९७ लाख |
| ७ | सावेडी सर्वे नं२८९ या ठिकाणी अतर्गंत रस्ते विकसित करणे | २२ लाख |
| ८ | सावेडी सर्वे नं२८९ या ठिकाणी १०० मे.टन क्षमतेचा खत प्रकल्प उभारणे | ५० लाख |
| ९ | कचरा संकलन व वाहतुकीकरीता ४.५ घन मीटर क्षमतेचे १० कंटेनर व २.५ घन मीटर क्षमतेचे १० कंटेनर खरेदी करणे | १५ लाख |
| १० | बुरुडगांव सर्वे नं.३४ या ठिकाणी सॅनिटरी लैंडफिल्ड साईट तयार विकसित करणे | १५० लाख |
| ११ | सावेडी सर्वे नं.२८९ या ठिकाणी सॅनिटरी लैंडफिल्ड साईट तयार विकसित करणे | १८० लाख |
| १२ | बुरुडगांव सर्वे नं.३४ या ठिकाणी कचरा डेपो भोवती हरीत पट्टे विकसित करणे | १५ लाख |
| १३ | सावेडी सर्वे नं.२८९ या ठिकाणी कचरा डेपो भोवती हरीत पट्टे विकसित करणे | १५ लाख |
| १४ | बुरुडगांव सर्वे नं.३४ या ठिकाणी विद्युत व्यवस्था व पाण्याची व्यवस्था करणे | ३५ लाख |
| १५ | सावेडी सर्वे. न. २८९ या ठिकाणी विद्युत व्यवस्था व पाणी व्यवस्था | ४० लाख |
| १६ | अहमदनगर महानगरपालिका हद्दी मध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे खाजगी यंत्रणेमार्फत संकलन व वाहतुक करणे. | १०० लाख |

| | | |
|---|---|---|
| १७ अ | बुरुडगांव सर्वे नं.३४ या ठिकाणी कच-यावर प्रक्रिया करणे करीता प्लॅट फॉर्म विकसीत करणे . | ४० लाख |
| १७ ब | सावेडी स. नं. २८९ या ठिकाणी कच-यावर प्रक्रिया करणे करीता रिसिव्हिंग प्लॅट फॉर्म विकसीत करणे | ४५ लाख |
| १८ | वडगांव गुप्ता रस्ता ते पोखर्डी शिवा वरील सावेडी सर्वे नं.२८९ या कचरा डेपो पर्यंत जाणारा रस्ता विकसित करणे | ७५ लाख |
| | एकुणः- | ११५७ लाख |

वरील विषय हे घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया व विल्हेवाटशी निगडीत आहेत. सदर बाबत मे. राष्ट्रीय हरीत लवादाकडेस दि.१६/०३/२०१६ पुर्वी वरील विषयाबाबत प्रशासकीय मान्यता घेवून कालबध्द आराखडा बाबत सविस्तर प्रतिज्ञा पत्र सादर करणे आवश्यक आहे. यासाठी तातडीने महासभेकडेस सदरचा विषय मंजुरी होणे आवश्यक आहे. तरी सदर बाबत वरील प्रमाणे विषय प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेणे करीता मा. शासन निर्णय क्र.टिएफसी ८०१५/प्र.क्र.१०६/नवि-४ दिनांक ०३/०८/२०१५ नुसार १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार प्राप्त झालेल्या अनुदानामधून वरील प्रमाणे कामांना प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत व तसेच सदर बाबत मा. राष्ट्रीय हरीत लवादाकडेस दि.१६/०३/२०१६ पुर्वी प्रतिज्ञा पत्र सादर करावयाचे असल्याने मा. महासभेकडेस प्रस्ताव सादर करणे बाबत सविनय सादर.

यावर उपायुक्त (कर) श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, प्रस्तावित नमूद प्रस्ताव दि.१६/११/२०१५ रोजी मा.महासभेपुढे पाठविणेत आला आहे. परंतू काल दि.०८/०३/२०१६ रोजी NGT पुणे येथे झालेल्या सुनावणीत सुमारे ३११ महिने महासभेत विषय होवू न शकल्याने दिनांक १६/०३/२०१६रोजी पूर्वी विषय मा.महासभेत घेवून प्रतिज्ञापत्र दाखल करणेचे आदेश असलेने त्वरीत तातडीची महासभा घेवुन विषयी चर्चा होवुन निर्णय घेणे आवश्यक आहे. करीता प्रस्ताव मा.महासभेपुढे घेणेसाठी पाठविणेचे आदेशार्थ सादर.

यावर अतिरिक्त आयुक्त श्री.विलास वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, उपरोक्त सविस्तर अहवालानुसार व दिनांक ०७/०३/२०१६ रोजी NGT, पुणे येथे झालेल्या सुनावणी प्रमाणे तातडीची बाब म्हणून सदर विषय प्राधान्याने घेणे गरजेचे आहे. मागील वेळी दिनांक ११/०२/२०१६ रोजी झालेल्या सुनावणी वेळी १५ दिवसाच्या आत बुरुडगांव येथील व सावेडी घनकचरा प्रकल्पा बाबत प्रस्तावित केलेल्या अनु.क्र.१ ते १८ रक्कम रु.११.५७ लाख कामाबाबत निर्णय घेणे बाबत निर्देश दिलेले होते. निर्णय न घेतल्यामुळे न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे. पुढील सुनावणी दिनांक १६/०३/२०१६ रोजी ठेवलेली आहे. तरी प्रशासकीय मान्यता देण्या बाबतची कार्यवाही त्यापूर्वी करणे आवश्यक आहे. तरी सदर कामी तातडीची महासभा घेणे कामी मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त श्री.विलास ढगे साहेब, यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर श्री.अभिषेक कळमकर साहेब यांचा अभिप्राय की, नगरसचिव, मा.स्थायी समिती सदस्य यांनी पत्र देवून केलेल्या मागणी नुसार प्रस्ताव मा.खास सभेपुढे ठेवा.

---*---

**चर्चा :-**

**मा.श्री.गणेश भोसले :-** १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०१४-२०१५ व सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षासाठी प्राप्त निधी तसेच आगामी आर्थिक वर्षासाठी प्राप्त होणारा निधी विचारात घेवून प्रस्तावात नमुद केलेल्या कामासह घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत सर्व कामे करणे कंटेनर, कॉम्पॅक्टर, घंटागाडया, सायकल रिक्षा, ढकलगाडया, फायबर कुंडया आदी खरेदी करणेस मान्यता देण्यात यावी.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** मंजूर करा.

**मा.श्री.विजय गव्हाळे :-** प्रस्ताव मंजूर करा.

**मा.महापौर साहेब :-** ऑफिस रिपोर्ट नुसार घनकचरा व्यवस्थापनावर ५० टक्के खर्च करणेच्या दृष्टीने सभागृहाचा कल तसेच सभागृहामधील चर्चा विचारात घेता वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०१४-२०१५ व सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षासाठी प्राप्त निधी तसेच आगामी आर्थिक वर्षासाठी प्राप्त होणारा निधी विचारात घेवून प्रस्तावात नमुद केलेल्या कामासह घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत सर्व कामे करणे तसेच कंटेनर, कॉम्पॅक्टर, घंटागाडया, सायकल रिक्षा, ढकलगाडया, फायबर कुंडया आदी खरेदी करणे कामी ही सभा मान्यता देत आहे. तथापि सभागृहातील चर्चा पाहता सादर केलेल्या प्रस्तावातील कामांची आवश्यकता तपासुन व खातरजमा करुन मा.आयुक्त यांनी सदर कामाच्या निविदा मागविण्या बाबत पुढील कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट नुसार घनकचरा व्यवस्थापनावर ५० टक्के खर्च करणेच्या दृष्टीने सभागृहाचा कल तसेच सभागृहामधील चर्चा विचारात घेता वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०१४-२०१५ व सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षासाठी प्राप्त निधी तसेच आगामी आर्थिक वर्षासाठी प्राप्त होणारा निधी विचारात घेवून प्रस्तावात नमुद केलेल्या कामासह घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत सर्व कामे करणे तसेच कंटेनर, कॉम्पॅक्टर, घंटागाडया, सायकल रिक्षा, ढकलगाडया, फायबर कुंडया आदी खरेदी करणे कामी ही सभा मान्यता देत आहे. तथापि सभागृहातील चर्चा पाहता सादर केलेल्या प्रस्तावातील कामांची आवश्यकता तपासुन व खातरजमा करुन मा.आयुक्त यांनी सदर कामाच्या निविदा मागविण्या बाबत पुढील कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे.

घनकचरा व्यवस्थापनाचे काम नागरी सुविधेच्या दृष्टिने अत्यावश्यक सुविधा कामकाज असल्याने प्रस्तावानुसार नियोजनबध्द कार्यवाही होण्याचे दृष्टिने कालबध्द कृती कार्यक्रम आखणी करुन सदर प्रस्तावाची कार्यवाही करणेस देखील ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री.कुमार बबन वाकळे,

अनुमोदक - मा.श्री.विजय नाना गव्हाळे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट नुसार घनकचरा व्यवस्थापनावर ५० टक्के खर्च करणेच्या दृष्टीने सभागृहाचा कल तसेच सभागृहामधील चर्चा विचारात घेता वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०१४-२०१५ व सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षासाठी प्राप्त निधी तसेच आगामी आर्थिक वर्षासाठी प्राप्त होणारा निधी विचारात घेवून प्रस्तावात नमुद केलेल्या कामासह घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत सर्व कामे करणे तसेच कंटेनर, कॉम्पॅक्टर, घंटागाडया, सायकल रिक्षा, ढकलगाडया, फायबर कुंडया आदी खरेदी करणे कामी ही सभा मान्यता देत आहे. तथापि सभागृहातील चर्चा पाहता सादर केलेल्या प्रस्तावातील कामांची आवश्यकता तपासुन व खातरजमा करुन मा.आयुक्त यांनी सदर कामाच्या निविदा मागविण्या बाबत पुढील कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे.

घनकचरा व्यवस्थापनाचे काम नागरी सुविधेच्या दृष्टिने अत्यावश्यक सुविधा कामकाज असल्याने प्रस्तावानुसार नियोजनबध्द कार्यवाही होण्याचे दृष्टिने कालबध्द कृती कार्यक्रम आखणी करुन सदर प्रस्तावाची कार्यवाही करणेस देखील ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक - मा.श्री.कुमार बबन वाकळे,

अनुमोदक - मा.श्री.विजय नाना गव्हाळे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.
नगरसचिव विभाग -
दिनांक : १५/०३/२०१६.

विषय : शुक्रवार दिनांक ११/०३/२०१६ रोजी दु. १.०० वा. झालेल्या सर्वसाधारण सभा क्रमांक ५ च्या चहापान खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत...

सादर,

विनंती रिपोर्ट की, महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्रमांक एम.सी.ओ. ४६८५-१८८२ सी. आर.६८-८६-युडी - १४ दिनांक २९ जुलै १९८६ अन्वये कळविले आहे की, चहा व इतर पदार्थांचे दर बदलत असतात म्हणून चहापानाचे कमाल दर परिपत्रकान्वये ठरवून देण्याची आवश्यकता वाटत नाही. कौन्सीलच्या सांविधीक समितीच्या बैठकीसाठी मनपा/नपा यांनी चहापानाचा खर्च आकस्मिक निधीतून (कॉन्टीजन्सी एक्सपेंन्डीचर) किती करावा हे प्रत्येक नगरपालिकेने ठरवावे त्याप्रमाणे खर्च करावा, अशी तरतूद आहे.

अहमदनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभा क्र. १ दिनांक १७/०२/२०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिका खास सभा/सर्वसाधारण सभेचा चहापान खर्च रक्कम रु. १८,०००/- करणेत आला आहे. अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सभा **शुक्रवार दिनांक ११ / ०३ / २०१६ रोजी दुपारी १.०० वाजता** नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह, अहमदनगर येथे झाली आहे.

सदर अहमदनगर महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित केलेल्या या सभेस उपस्थित सभासदांचे चहापानाकरीता रक्कम रु. १४,५००/- (अक्षरी रक्कम रुपये चौदा हजार पाचशे फक्त) च्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळावी, सदरचा खर्च नगरसचिव विभागाच्या * **सभेचे चहा नाष्टा बील** * या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविण्याच्या मान्यतेस्तव तसेच सदरचा खर्च श्री.एम.एम.वैद्य, नगरसचिव, अहमदनगर महानगरपालिका यांनी केला असुन सदरचा धनादेश श्री.एम.एम.वैद्य, यांचे नांवे काढणे बाबत मुख्यलेखाधिकारी यांना आपलेस्तरावरुन आदेश होणेस विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| **तरतुद** | : | **४,००,०००/-** |
| **पुर्वीचा खर्च** | : | **१,२४,००२/-** |
| **हया बीलात दाखविलेला खर्च** | : | **१४,५००/-** |
| **उपलब्ध शिल्लक** | : | **२,६१,४९८/-** |

प्र.नगरसचिव,
नगरसचिव विभाग,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रति,
पोलीस निरीक्षक,
तोफखाना पोलिस स्टेशन,
अहमदनगर.

विषय : शुक्रवार दिनांक ११ / ०३ /२०१६ रोजी होणा-या अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.विशेष सभेसाठी पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत...

महोदय,

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, शुक्रवार दिनांक ११ / ०३ / २०१६ रोजी दुपारी १.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सभा **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी सदर दिवशी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन अहमदनगर महानगरपालिका सभागृहास पुरेसा पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत विनंती आहे.

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.पोलीस अधिक्षक, पोलिस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.
जा.क्र.नगरसचिव/AMC.-
दिनांक :       /०३/२०१६.

संबंधीत खाते प्रमुख व शाखा प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस.-

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सभा शुक्रवार दिनांक ११ / ०३ / २०१६ रोजी दुपारी १.०० वाजता **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपल्या नावासमोर दर्शविलेल्या कामाची आपण पुर्तता करावी.

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | शहर अभियंता | : | या सभेकरीता स्टेजवरील व्यवस्थेसह हॉलमधील मा.नगरसेवकांच्या संख्येनुसार तसेच विभाग प्रमुख, पत्रकार व नागरिक यांच्या संख्येनुसार सभागृहातील बैठक व्यवस्था पाहुन ज्या सोयी सुविधा सभेसाठी आवश्यक असतील त्या कराव्यात |
| २) | घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख | : | महानगरपालिका सभागृहाचे आसपासचे भागाची साफसफाई करुन घेण्याबाबत संबंधितांस सुचना द्याव्यात. |
| ३) | प्रसिध्दी अधिकारी | : | बैठकीची सुचना व विषयपत्रिका या सोबत जोडली आहे. त्याची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रात त्वरीत प्रसिध्द करावी व प्रसिध्दीचे २ (दोन) अंक इकडेस पाठवावेत. |
| ४) | इलेक्ट्रीक सुपरवायझर | : | वरीलप्रमाणे नोंद घेवून महानगरपालिका सभागृहातील सभेकरीता लाईट व लाऊड स्पीकरची व्यवस्था करण्यात यावी. तसेच नेहमीप्रमाणे टेपरेकॉर्डची सुध्दा व्यवस्था करण्यात यावी. |
| ५) | श्री.एल.डी.बनकर, रक्तपेढी विभाग | : | महानगरपालिका सभागृहात सभेपुर्वी उपस्थित राहुन सभेच्या वेळेस विषय वाचन करावे. |
| ६) | श्री.चंद्रकला खलचे, अकौंट विभाग | : | आपण सभेपुर्वी महानगरपालिका सभागृहात उपस्थित राहुन संपुर्ण सभेचे प्रोसिडींग घेण्याचे काम करावे. |
| ७) | श्री.अशोक चेन्नुर, पाणीपुरवठा विभाग | : | महानगरपालिका सभागृहात राष्ट्रगीत म्हणणे करीता सभेपुर्वी उपस्थित रहावे. |
| ८) | मनपा हवालदार | : | वरील प्रमाणे नोंद घेवुन महानगरपालिका सभागृहात आवश्यक ती पुर्तता करावी. |

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.
प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

कार्यालयीन आदेश.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
जा.क्र.नगरसचिव.AMC.-
दिनांक :       / ०३ /२०१६.

१) श्री.बंडु इवळे, महापौर कार्यालय,
२) श्री.संजय डहाळे, सभागृह नेता कार्यालय,
३) श्री.शंकर बहिरवाडे, आयुक्त कार्यालय,
४) श्री.मच्छिंद्र बेरड, उपायुक्त कार्यालय,
५) श्री.गुंड, उपमहापौर कार्यालय.
६) श्री.संजय पवार, नगररचना विभाग,
७) श्री.राजू गोरे, प्रकल्प विभाग
८) श्री.गणेश वरुटे, सामान्य प्रशासन विभाग,
९) श्री.कैलास धाडगे, संगणक विभाग
अहमदनगर महानगरपालिका.

यांस.-

आदेशीत करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सभा शुक्रवार दिनांक ११ / ०३ / २०१६ रोजी दुपारी १.०० वाजता **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी आपण दुपारी १२.०० वाजता कार्यालयीन गणवेशात हजर रहावे व मनपा हवालदार यांच्या सूचनेनुसार काम पहावे.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : महानगरपालिका हवालदार, अहमदनगर महानगरपालिका यांस माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक-५ शुक्रवार दिनांक ११ / ०३ / २०१६

| अ.नं. | विषय | विभाग | विषयाबाबत विभागाचे थोडक्यात अभिप्राय | मा.महासभेतील निर्णय |
|---|---|---|---|---|
| ५८ | चौदावा वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार ५० टक्के घनकचरा व्यवस्थापन कामाकरीता खर्च करण्यासाठी प्राप्त झालेल्या व प्राप्त होणा-या निधीतुन हाती घ्यावयाचे कामास प्रशासकीय मंजुरी देणे बाबत.. **(संदर्भ : दि.०७/०३/२०१६ रोजी मे.राष्ट्रीय हरीत लवाद, पुणे यांनी दिलेले आदेश)** | घनकचरा व्यवस्थापन विभाग | दि.०७/०३/२०१६ रोजी मे.राष्ट्रीय हरीत लवाद, पुणे यांनी दिलेले आदेशान्वये विषय मा.महासभेत अति तात्काळ घेणे | |
| ५९ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. | | | |